॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# निवेदन

## 23 वा पदवीप्रदान समारंभ

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे मार्च/एप्रिल/मे-2014 व त्यापुर्वी घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत अश्या सर्व विद्यार्थ्यांकडून पदवी/पदविका प्रमाणपत्रांसाठी Online अर्ज मागविण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांना पदवी/पदविका प्रदान करण्यासाठी **"तेविसावा पदवीप्रदान समारंभ"** आयोजीत करण्यात येणार आहे. .

**23 व्या** पदवीप्रदान समारंभात ज्या विद्यार्थ्यांना पदवी/पदविका प्रमाणपत्रे घ्यावयाची आहे, अशा विद्यार्थ्यांना पदवी/पदविका प्रमाणपत्रे मिळण्यासाठी भरावयाचे **Online अर्ज विद्यापीठाच्या** www.nmu.ac.in **या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) Home Page** वरील Student Corner → Examination → Convocation **वर उपलब्ध आहेत.** तरी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर **Online पदवीप्रमाणपत्र अर्ज भरावा.** अर्ज भरण्याबाबत अधिकची माहिती विद्यापीठाच्या वरील संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेली आहे.

### -: पदवी/पदविका प्रमाणपत्र अर्ज करावयाचा विहित कालावधी :-

| | |
|---|---|
| **विना विलंब शुल्कासह Online अर्ज भरण्याची मुदत** | **दि. 26 ऑगस्ट, 2014 ते दि. 20 ऑक्टोंबर, 2014** |
| **विलंब शुल्कासह Online अर्ज भरण्याची मुदत** | **दि. 21 ऑक्टोबर, 2014 ते दि. 31 ऑक्टोबर, 2014** |
| **Online भरलेल्या अर्जाची Hard Copy विद्यापीठात प्रत्यक्ष/टपालाने स्विकारण्याची अंतीम मुदत** | **दि. 10 नोव्हेंबर, 2014 पर्यंत पोहचतील अशा बेताने पाठवावेत.** |

**उपरोक्त मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.**

**पदवी/पदविका अर्जासोबत भरावयाचे शुल्क खालीलप्रमाणे**

| | | |
|---|---|---|
| 1 | **पदवीप्रमाणपत्र शुल्क** | **रू. 350/-** |
| 2 | **उत्तीर्ण वर्षापासून पाचवर्षापेक्षा जास्तीचा कालावधी झाला असल्यास शुल्क** | **रू. 1000/-** |
| 3 | **विलंब शुल्क** | **रू. 100/-** |

पदवीप्रमाणपत्राचे शूल्क Online चलनाव्दारे नजीकच्या सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत भरावे.

पदवीप्रदान समारंभाबाबतची सर्व माहिती यथावकाश वर्तमानपत्रात तसेच विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेत स्थळावर जाहिर केली जाईल. तरी मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये व मा. संचालक, मान्यताप्राप्त संस्था यांना विनंती की, त्यांनी सोबतची माहिती सर्व संबंधित **विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देवून विद्यापीठास सहकार्य करावे.**

आपला विश्वासू,

**परीक्षा नियंत्रक**

जा.क्र. उमवि/पदवी/7ह/4129/2014 दि. 30/08/2014

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :**

1) मा. प्राचार्य/म. संचालक, सर्व महाविद्यालये/संस्था यांना विनंती की, हे निवेदन सूचना फलकावर लावण्याची व्यवस्था करावी.
2) उमवि अंतर्गत सर्व विभाग प्रमुख (प्रशासकीय व शैक्षणिक विभाग)
3) मा. संपादक दै. यांना जळगाव, धुळे व नंदूरबार जिल्ह्यातून प्रसिद्धीसाठी
4) मा. संपादक दै. यांना मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, अहमदनगर प्रसिद्धीसाठी

# ऑनलाईन अर्ज भरण्याबाबतच्या आवश्यक सूचना

## अ) ऑनलाईन पदवीप्रमाणपत्र अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी करावयाची कार्यवाही.

1. विद्यार्थ्याने या प्रक्रीयेसाठी स्वत:चा अलिकडचा रंगीत पासपोर्ट साईजचा फोटो व स्वाक्षरी योग्य पध्दतीने Scan करता यावी याकरीता संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या Photo Signature Tamplete वर 1.25 X 1.5 inch या आकाराचा फोटो योग्य त्या जागेवर चिकटवून Scan करावा तसेच स्वत:ची स्वाक्षरी ही 1.25 X 0.5 inch या आकाराच्या चौकटीत करून Scan करावी.
2. विद्यार्थ्याने रंगीत फोटो व स्वाक्षरी 96 ते 150 dpi पर्यंत स्कॅनिंग करणे आवश्यक आहे.
3. स्कॅन केलेला फोटो व स्वाक्षरी प्रमाणपत्रावर अंकीत होणार असल्याने विद्यार्थ्यांने आपली प्रचलित स्वाक्षरी करावी.
4. पदवीप्रमाणपत्र अर्जासाठीचे शूल्क Online चलनाव्दारे भरता येईल, Online अर्ज भरल्यापश्चात अर्जाच्या Hard Print सोबत Online चलनाची Hard Print घ्यावी, आणि नजीकच्या सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या शाखेत शूल्क भरावे. बँकेत शूल्क जमा केल्यानंतर मिळालेल्या चलनाचा **'B' Part** पदवीप्रमाणपत्र अर्जाच्या Hard Print सोबत जोडावा.
5. आपणास ज्या पदवी/पदविका प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर करावयाचा आहे, त्या अभ्यासक्रमाच्या प्रथम ते अंतिम वर्षांच्या गुणपत्रकांच्या सांक्षाकित छायाप्रती अर्जासोबत जोडाव्यात.

## ब) ऑनलाईन पदवीप्रमाणपत्र अर्ज भरण्याकरीता विद्यार्थ्याने करावयाची कार्यपध्दती.

**विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) Home Page वरील Student Corner ⇉ Examination ⇉ Convocation यावर ऑनलाईन अर्ज उपलब्ध आहे.**

**i)** Online अर्ज भरतांना विद्यार्थ्यांनी आपला परमनंट रजिष्ट्रेशन नंबर (PRN) अचुक टाकावा त्यानंतर विद्यार्थ्याचा पूर्ण भरलेला अर्ज तयार होईल, त्यानंतर Online Form भरण्याची प्रक्रीया सुचनेप्रमाणे करावी.

**ii)** जर अचुक PRN टाकल्यानंतर आपला Examination Record उपलब्ध नाही, अशी सूचना आल्यास Please Click Heare to Continue to Online Application to Regular Degree Certificate या Link वर Click करून अंतिम वर्षाच्या गुणपत्रकाप्रमाणे संपूर्ण माहिती अचुकपणे भरावी. .

**एकदा अर्ज सबमिट झाल्यावर त्यामध्ये नंतर दुरूस्ती होणार नसल्याने विद्यार्थ्यांनी ही प्रक्रीया काळजीपूर्वक करावी.**

6. विद्यार्थ्यांने स्कॅन केलेला फोटो व स्वाक्षरी अपलोड करावी.
7. ऑनलाईन अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळावर परीपूर्ण भरून झाल्याची तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्या अर्जाची A4 साईजच्या कागदावर प्रींट काढण्यात यावी.
8. प्रिंट झालेल्या पदवीप्रमाणत्र अर्जावर विद्यार्थ्यांने स्वाक्षरी करावी.
9. प्रिंट झालेल्या पदवीप्रमाणत्र अर्जासोबत विद्यार्थ्याने संबंधित पदवी/पदविका वर्गाच्या प्रथम ते अंतीम वर्षाच्या गुणपत्रकाच्या साक्षांकित छायाप्रती (Photocopy) जोडाव्यात.
10. पदवीप्रमाणपत्र शूल्क Online चलनाव्दारे बँकेत जमा केल्यानंतर मिळालेल्या चलनाचा **'B' Part** पदवीप्रमाणपत्र अर्जाच्या Hard Print सोबत जोडावा व **'C' Part** स्वत:जवळ ठेवावा.
11. पदवीप्रमाणपत्र अर्जासोबत उपरोक्तप्रमाणे गुणपत्रके, Online चलनाचा **'B' Part** जोडावा व विद्यापीठाने विहित केलेल्या मुदतीत खालील पत्त्यावर पाठवावा. पाकिटावर **"पदवीप्रमाणपत्र अर्ज"** असा स्पष्ट उल्लेख करावा.

**मा. परीक्षा नियंत्रक, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, पोष्ट बॉक्स नं. 80, उमविनगर, जळगाव.**

**1. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.**

**2. पदवीप्रमाणपत्र अर्जात अपूर्णता अथवा चुकीची माहिती असल्यास सदर पदवीप्रमाणपत्र अर्ज नस्तीबध्द केला जाईल व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही तसेच अर्जासोबत भरलेले शूल्क परत मिळणार नाही.**

**3. Online अर्जाची छायांकीत प्रत व Online चलनाचा Part-C विद्यार्थ्याने स्वत:जवळ ठेवावा.**